# दि कल्याण जनता सहकारी बँक लि. (शेडयुल्ड बँक)

## ४० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

रविवार दि. ११.०८.२०१३ रोजी बँकेची ४० वी वार्षिक सर्वसाधारण सभा अत्रे रंगमंदिर, कल्याण (प) येथे सकाळी ११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती.

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अतुल खिरवडकर यांनी ठीक ११.०० वाजता आवश्यक तेवढी गणसंख्या असल्याचे जाहीर केले. सर्व उपस्थितांचे हार्दिक स्वागत करुन सभेची सूचना वाचून दाखविली. तसेच अहवालातील मुद्रणदोषही सांगितले.

मा. अध्यक्ष श्री. मोहन आघारकर यांनी ३९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त व विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त मा. संचालक श्री. अनिरुध्द जाधव यांना सभेपुढे सादर करण्यास सुचविले.

रविवार दि. २९.०७.२०१२ रोजी झालेल्या ३९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे व शनिवार दि. १३.०४.२०१३ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त मा. संचालक श्री. अनिरुध्द जाधव यांनी सभेपुढे सादर केले. सदर इतिवृत्त सर्व सभासदांना आधीच उपलब्ध करुन देण्यात आले होते. यानंतर मा. अध्यक्ष श्री. मोहन आघारकर यांनी सभेपुढे ठराव मांडला व खालीप्रमाणे ठराव मंजूर / पारीत करण्यात आला.

ठराव क्र. १ : रविवार दि. २९.०७.२०१२ रोजी झालेल्या ३९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे तसेच, शनिवार दि. १३.०४.२०१३ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त मा. संचालक **श्री. अनिरुद्ध सूर्यभान जाधव** यांनी सभेपुढे मांडले. त्यास ही सभा कायम करीत आहे.

| | | |
|---|---|---|
| सूचक : | नाव : श्री. गणेश ठोसर | सभासद क्र. २९०१७ |
| अनुमोदक : | नाव : श्री. दिनेश पांडे | सभासद क्र. ३७४६७ |
| | ठराव सर्वानुमते मंजूर. | |

यानंतर बँकेचे उपाध्यक्ष, मा. प्रा. विलास पेणकर यांनी अहवाल सालात देवाज्ञा झालेल्या मान्यवर व्यक्ती व सभासद यांना श्रध्दांजली अर्पण करण्याचा ठराव मा. अध्यक्षांच्या वतीने सभेत मांडला व तो खालीलप्रमाणे मंजूर / पारीत करण्यात आला.

ठराव क्र. २ : **दुखवटयाचा ठराव -**

अहवाल सालात ज्या मान्यवरांचे व सभासदांचे निधन झाले, तसेच उत्तराखंडातील निर्सगाचा प्रकोप झाल्यामुळे महाराष्ट्र तसेच अन्य प्रांतातील प्राण गमवावे लागलेल्या भाविकांना तसेच सीमेवरील शहीद जवानांना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून ही सभा श्रध्दांजली वाहत आहे.

माजी पंतप्रधान **इंद्रकुमार गुजराल,** केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान मंत्री आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री **विलासराव देशमुख,** माजी केंद्रीय मंत्री **विद्याचरण शुक्ल,** माजी केंद्रीय मंत्री व तेलगु देसम् पक्षाचे नेते **येरन नायडू,** माजी विधानसभा अध्यक्ष **बाबासाहेब कुपेकर,** माजी विधानसभाध्यक्ष **दत्ताजी नलावडे,** महाराष्ट्र राज्याचे माजी आरोग्य मंत्री **दिग्विजय खानविलकर,** रा. स्व. संघाचे माजी सरसंघचालक **के. सी. सुदर्शनजी,** शिवसेना प्रमुख

**बाळासाहेब ठाकरे,** माजी सरन्यायाधीश **जगदीशशरण वर्मा,** शे. का. प. नेते **दि. बा. पाटील,** माजी आमदार **प्रभाकर कुंटे,** बँकेचे माजी संचालक **कांचन रामजी वाडू,** धवल क्रांतीचे प्रणेते **डॉ. कुरियन वर्गिस,** प्रसिद्ध दिग्दर्शक **संजय सूरकर,** चित्रपट निर्माता व दिग्दर्शक **यश चोपडा,** प्रख्यात प्रहसनकार **जसपाल सिंग भट्टी,** नृत्य गुरु **आचार्य पार्वतीकुमार,** सुप्रसिद्ध सतारवादक **पं. रवीशंकर,** अभिनेते **आनंद अभ्यंकर,** अभिनेते **अक्षय पेंडसे,** किस्त्रीमचे संपादक **मुकुंदराव किर्लोस्कर,** ज्येष्ठ रंगकर्मी **सुहास भालेकर,** प्रख्यात गायिका **शमशाद बेगम,** अभिनेता **सतीश तारे,** सिने अभिनेते **प्राण,** लेखिका **माधवी देसाई,** शिक्षणतज्ज्ञ **प्रा. सुरेंद्र बाजपेई,** ज्येष्ठ गायिका व अभिनेत्री **जयमाला शिलेदार,** ज्येष्ठ निसर्ग चित्रकार **शिवाजी तुपे.**

## दिवंगत सभासदांची यादी

### जून २०१२ ते जून २०१३ या कालावधीत दिवंगत झालेल्या सभासदांची यादी

| क्र. | सभासद क्र. | सभासदाचे नाव | मृत्यू दिनांक |
|---|---|---|---|
| १. | १७८१३ | जाधव अशोक यशवंत | ०१.०६.२०१२ |
| २. | २९०९५ | वोरा शांतीलाल रवीलाल | ०९.०६.२०१२ |
| ३. | ३४२१७ | बडगुजर सरस्वती गजानन | १७.०६.२०१२ |
| ४. | ४२६६३ | जोशी अजीत मधुकर | २३.०६.२०१२ |
| ५. | ११५५५ | पाटील बळीराम देवंचद | २४.०६.२०१२ |
| ६. | २४६७८ | ढालवाले हिराबाई सोनु | २४.०६.२०१२ |
| ७. | ३८७ | साठे सुलभा गजानन | १७.०७.२०१२ |
| ८. | २६५८२ | खरात भगवान आनंदा | ३१.०७.२०१२ |
| ९. | ८७७१ | जाधव प्रकाश कृष्णा | १७.०८.२०१२ |
| १०. | १७१३२ | कुलकर्णी सुभाष दत्तात्रय | ०३.०९.२०१२ |
| ११. | ४२५० | गिरी राजाराम केशव | ०९.०९.२०१२ |
| १२. | ३६४०१ | गुप्ते प्रकाश कमलाकर | १८.०९.२०१२ |
| १३. | ३४१८ | दाते तुकाराम जिजा | २१.०९.२०१२ |
| १४. | ८५७८ | वेदक मनोहर विठ्ठल | १०.१०.२०१२ |
| १५. | ४५७३ | काणे प्रभाकर वामन | २८.१०.२०१२ |
| १६. | ३१९४८ | ढोणे कृष्णा गणपत | ३०.१०.२०१२ |
| १७. | २३०४० | गणपुले उषा वसंत | २७.११.२०१२ |
| १८. | १२११६ | कर्पे अनिल महादेव | ०५.१२.२०१२ |
| १९. | २४७६७ | कुर्मी रामसमुज बुदाई | ०७.१२.२०१२ |
| २०. | ४६६ | गोखले सुमित्रा विष्णु | १३.१२.२०१२ |
| २१. | १४८०८ | गायकवाड नारायण हिरामण | २३.१२.२०१२ |
| २२. | २५२९७ | डोंगरे दत्तात्रय अंबादास | २३.१२.२०१२ |
| २३. | ३५५२८ | बठिजा राणी उद्धव | २४.१२.२०१२ |
| २४. | ९६४१ | जगताप चंद्रभागा पांडुरंग | ३१.१२.२०१२ |

| क्र. | सभासद क्र. | सभासदाचे नाव | मृत्यू दिनांक |
|---|---|---|---|
| २५. | १८१४९ | सोमण प्रभाकर सखाराम | ०६.०१.२०१३ |
| २६. | ४३६३ | गोडबोले यशवंत अनंत | ०७.०१.२०१३ |
| २७. | ४४६२२ | हिंदुराव (देशमुख) शांताराम ढुंडीराम | ०९.०१.२०१३ |
| २८. | २५८४२ | पिचम्मा राजमनी | १८.०१.२०१३ |
| २९. | १८६५ | जोशी शशिकांत दत्तात्रय | १९.०१.२०१३ |
| ३०. | १११०३ | कुलथे जर्नादन पुंजाजी | १९.०१.२०१३ |
| ३१. | ७०६९ | सोनार प्रभाकर बाळा | २४.०२.२०१३ |
| ३२. | ४१०७९ | चव्हाण किशोर हरी | ०६.०४.२०१३ |
| ३३. | १४१३० | काळे प्रमोद रामचंद्र | २२.०४.२०१३ |
| ३४. | १३७५४ | पाटील धनंजय काशीनाथ | २३.०५.२०१३ |

वरीलप्रमाणे दिवंगत मान्यवर व्यक्ती, बँकेचे सभासद, उत्तराखंडमधील नैसर्गिक प्रकोपात बळी पडलेले भाविक, सीमेवरील शहीद जवान अशा सर्वांना श्रध्दांजली अर्पण करुन ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो, अशी प्रार्थना करण्यात आली.

यानंतर मा. अध्यक्ष श्री. मोहन आघारकर यांचे अध्यक्षीय भाषण झाले. सर्व उपस्थित सभासदांचे पुन्हा एकदा स्वागत करुन त्यांनी आपले मनोगत दृक्‌श्राव्य माध्यमातून व्यक्त केले.

बँकेच्या आजमितीस ३० शाखा आहेत. गेल्या वर्षी ४ नवीन शाखा सुरु केलेल्या आहेत. त्यामध्ये भोसरी, ठाणे (LBS मार्ग), चिंचपाडा रोड व डोंबिवली येथे नव्या शाखा सुरु केलेल्या आहेत. यानंतर त्यांनी बँकेच्या प्रगतीचा आढावा घेतला. भाग भांडवल ₹ ५१.४१ कोटी झाले आहे. त्यामध्ये ४०.२०% वाढ झाली आहे. राखीव व इतर निधी ₹ ९४.७९ कोटी झाले आहेत. त्यामध्ये ८.५४% वाढ झाली आहे. ठेवी ₹ १३०९ कोटी झाल्या असून त्यामध्ये १८.२०% वाढ झाली आहे. कर्जे ₹ ९३१ कोटी झाली असून त्यामध्ये १६.०५% वाढ झाली आहे. बँकिंग क्षेत्रात सरासरी वाढ १५% असताना आपल्या बँकेची ठेवी व कर्जात अनुक्रमे १८% व १६% वाढ झाली आहे. भांडवल पर्याप्तता प्रमाण १२.५६% आहे. निव्वळ नफा ₹ १५.०८ कोटी झाला आहे. त्यामध्ये २४.०२% वाढ झाली आहे. कर्मचारी उत्पादकता ह्या वर्षामध्ये नवीन कर्मचारी भरतीमुळे थोडी कमी असून ती ₹ ५.४७ कोटीवरुन ₹ ५.४० कोटी झाली आहे. नवीन शाखा उघडल्यानंतर त्यामध्ये किमान कर्मचा-यांची नेमणूक करावी लागते त्यामुळे सदर फरक दिसत आहे. परंतु पुढील आर्थिक वर्षात त्याचे सकारात्मक परिणाम दिसून येतील. सकल अनुत्पादित कर्जे ३.७४% आहेत. त्यामध्ये मागील वर्षीच्या तुलनेत थोडी वाढ झालेली आहे. परंतु निव्वळ अनुत्पादित कर्जे ०% आहे.

तसेच रिझर्व्ह बँकेचे सक्षमतेकरीता असणारे मापदंड म्हणजे भांडवल पर्याप्तता प्रमाण, Gross NPA, Net NPA व कर्जाचे ठेवींशी असलेले प्रमाण बँकेने पूर्ण केले आहेत. CRR व SLR हे देखील रिझर्व्ह बँकेच्या नियमाप्रमाणे पाळलेले आहे. बँकेच्या स्थापनेपासून दरवर्षी वृध्दींगत नफा मिळविलेला आहे. त्यानंतर बँकेच्या मागील ५ वर्षाच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला. मागील पाच वर्षात ठेवी व कर्जात दुप्पट वाढ झालेली आहे. भाग भांडवलात तिप्पट वाढ झालेली आहे. रिझर्व्ह बँकेच्या निकषांनुसार ज्या बँकेचे Net Worth ₹ १०० कोटीच्या वर आहे. त्या बँकांना Net Banking करीता रिझर्व्ह बँकेकडून परवानगी मिळू शकते. आपल्या बँकेने Net Banking च्या परवानगीकरीता अर्ज केलेला आहे. नंतर अध्यक्षांनी बदललेल्या आर्थिक परिस्थितीबाबत निवेदन सादर केले.

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरपदी श्री. रघुराम राजन यांची नेमणूक झालेली आहे. गेल्या महिन्याभरात रुपयाचे झालेले अवमूल्यन, महागाई निर्देशांकात झालेली वाढ तसेच आटत चाललेली परदेशी गुंतवणूक यांचा परिणाम जाणवत आहे. काही व्यापारी बँकांनी व्याजदरात वाढ करण्यास सुरुवात केलेली आहे. ठेवीवरील व्याजदरात वाढ परंतु कर्जावरील व्याजदरात वाढ करण्यास मर्यादा आलेल्या आहेत. त्यामुळे आर्थिक प्रगतीत अडथळे येतात. सरकारने बँकांना कमी नफ्यांमध्ये काम करण्याचे मार्गदर्शन केले आहे. कर्जास मागणी कमी झाल्याने बँकांमध्ये स्पर्धा वाढलेली आहे. त्यामुळे बँकांच्या नफ्यावर विपरित परिणाम होऊ शकतो तसेच पहिल्या तिमाहीत बँकिंग व्यवसायात Net NPA वाढलेले दिसत आहेत. एकूणच आर्थिक परिस्थिती गंभीर स्वरूप धारण करीत आहे. आपले संचालक मंडळ या सर्व घडामोडीचे सूक्ष्म निरीक्षण करीत आहे व याही परिस्थितीत आपण आपली बँक प्रगती पथावर ठेवू शकू याची खात्री आहे.

यानंतर मा. अध्यक्षांनी बँकेने केलेल्या ग्राहक सेवेबाबत विस्तृत माहिती दिली. बँकेने महिला बचत गटांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन दिले आहे. एकूण ९४ बचत गटांना ₹ ५० लाखाचे आर्थिक सहाय्य दिले आहे. बँकेच्या २८ शाखांमध्ये NRE खाते उघडण्याची सुविधा रिझर्व्ह बँकेने दिली आहे. मा. अध्यक्षांनी सर्व सभासदांना त्यांचे पाल्य, नातेवाईक अथवा मित्रमंडळी परदेशात गेलेले असल्यास त्यांची NRE खाती आपल्या बँकेत उघडण्यास सांगण्याचे, आवाहन केले.

तसेच आपली बँक RTGS / NEFT, ECS अशा प्रकारच्या Electronic सेवा खातेदारांना पुरवित आहे, अशी माहिती दिली.

यानंतर मा. अध्यक्षांनी मागील वर्षभरात झालेल्या उल्लेखनीय कार्यक्रमांचा आढावा घेतला.

उल्हासनगर - ४ शाखेचे नवीन वास्तूत स्थलांतरण करण्यात आले. सदर कार्यक्रमास मा. आमदार श्री. कुमार आयलानी व मा. श्री. महेश खैरारी (अध्यक्ष - कोणार्क बँक) उपस्थित होते.

दि. २५.०३.२०१३ रोजी वाडा शाखेचे ATM व Lockers सुविधेचे उद्घाटन केले.

भोसरी येथे दि. २ ते ४ नोव्हेंबर २०१२ या कालावधीत कार मेळावा आयोजित करण्यात आला. सदर मेळाव्यात विविध कंपन्यांच्या ८ वितरकांतर्फे अंदाजे ३० गाडया प्रदर्शनार्थ दाखल झाल्या होत्या. टाटा मोटर्सचे उपाध्यक्ष मा. श्री. गिरीश वाघ (Nano गाडीचे Designer) यांनी महोत्सवास आवर्जून भेट दिली.

आपल्या बँकेच्या वर्धापन दिनानिमित्त दि. २३ डिसेंबर २०१२ रोजी मुख्य व रामबाग शाखेत KIOSK Machine बसविण्यात आले. KIOSK Machine मुळे ग्राहकांना स्वतःचे पासबुक स्वतः प्रिंटिंग करता येऊ शकते तसेच खाते उतारा प्रिंटिंग, खात्यातील शिल्लक रकमेची चौकशी व चेक भरणे इ. सुविधा प्राप्त होतात.

शाखांमध्ये बसविण्यात आलेल्या Digital display च्या माध्यमातून बँकेच्या विविध जाहिराती तसेच निरनिराळ्या सूचना देण्यात येत आहेत.

जागतिक सहकार वर्षानिमित्त २०१२ वर्षात बँकेने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले दि. ५ सप्टेंबर २०१२ रोजी बँकेने काही शाळा व महाविद्यालयातून शिक्षक दिन साजरा केला. बँकेचे संचालक व कर्मचा-यांनी या कार्यक्रमांचे आयोजन करुन शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

दि. २० ऑक्टोबर २०१२ रोजी महिला सभासद, महिला ग्राहक यांचेकरीता महाभोंडल्याचे आयोजन केले. जवळ जवळ ६५० पेक्षा अधिक महिला सामील झाल्या होत्या.

तसेच आणखी काही आगळ्या वेगळ्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. दि. १५ सप्टेंबर रोजी अभियंता दिनाचे बँकेने आयोजन केले होते. त्यास इंजिनिअरिंग मध्ये डॉक्टरेट संपादन केलेल्या डॉ. अजित मराठे यांना आमंत्रित करण्यात आले होते. बँकेचे खातेदार व सभासद असलेले एकूण ७५ इंजिनिअर्स कार्यक्रमास उपस्थित होते.

दि. ३१ ऑक्टोबर २०१२ रोजी नाशिक येथे प्रोफेशनल मीट आयोजित करण्यात आली होती. डॉ. गोविलकर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच दि. २ डिसेंबर २०१२ रोजी बदलापूर येथे प्रोफेशनल मीट आयोजित करण्यात आली होती. त्यास सहकार भारतीचे अध्यक्ष श्री. सतीश मराठे उपस्थित होते.

दि. २१ नोव्हेंबर २०१२ रोजी खारघर येथे ग्राहक मेळाव्याचे आयोजन केले होते. मा. उपाध्यक्षांनी तेथे मार्गदर्शन केले. जागतिक सहकार वर्षानिमित्त दि. २५ डिसेंबर २०१२ रोजी अत्रे रंगमंदिर कल्याण येथे सहकार वर्षाचा सांगता समारंभ आयोजित केला होता. सहकार आयुक्त मा. श्री. मधुकरराव चौधरी व कॉसमॉस बँकेचे माजी अध्यक्ष मा. मुकुंदराव अभ्यंकर कार्यक्रमास उपस्थित होते. वर्षभरात आयोजित केलेल्या उपक्रमाची पुस्तिका आपण काढलेली आहे.

२०१२-१३ या आर्थिक वर्षात बँकेने उल्लेखनीय यश प्राप्त केलेले आहे. बँकिंग फ्रंटीयर या मासिकातर्फे ज्युरी ॲवॉर्ड आपल्या बँकेस प्राप्त झालेला आहे. तसेच सहकार सुगंध तर्फे मोठ्या बँकांच्या गटामध्ये (₹ १००० कोटी पेक्षा जास्त व्यवसाय असणाऱ्या) आपल्या बँकेच्या वार्षिक अहवालाकरीता द्वितीय पुरस्कार प्राप्त झालेला आहे.

गुढीपाडव्यानिमित्त डोंबिवली नगरीत आपण नववर्ष स्वागत यात्रेत सहभाग घेतला. महिलांचे सबलीकरण या विषयावर चित्ररथ सादर करण्यात आला होता. बँकेच्या चित्ररथास उत्तेजनार्थ पुरस्कार प्राप्त झालेला आहे.

यावर्षी बँकेने नवीन चार शाखा अनुक्रमे भोसरी, LBS रोड ठाणे, चिंचपाडा रोड व डोंबिवली येथे कार्यान्वित केल्या.

१. **भोसरी शाखा -** भोसरी येथे बँकेच्या २७ व्या शाखेचे उद्घाटन दि. ०९.१२.२०१२ रोजी झाले. उद्घाटनास मा. आमदार सौ. पंकजा मुंडे - पालवे व मा. श्री. भिकुजी तथा दादा ईदाते उपस्थित होते.
२. **चिंचपाडा रोड शाखा -** दि. १७.०३.२०१३ रोजी चिंचपाडा रोड येथील शाखेचे उद्घाटन मा. श्री. रामउजागर तिवारी (संस्थापक साकेत कॉलेज, कल्याण) यांच्या हस्ते झाले. ATM चे उद्घाटन मा. आमदार श्री. गणपत गायकवाड यांच्या हस्ते झाले.
३. **LBS रोड, ठाणे -** दि. २४.०३.२०१३ रोजी LBS रोड, ठाणे येथे बँकेच्या २९ व्या शाखेचे उद्घाटन मा. श्री. मिलींद पाटणकर (उपमहापौर ठाणे महानगरपालिका) व मा. श्री. श्रीनिवास घैसास (कर सल्लागार) यांचे हस्ते करण्यात आले.
४. **डोंबिवली शाखा -** दि. २९.०३.२०१३ रोजी डोंबिवली शाखेचे उद्घाटन मा. आमदार श्री. रविंद्र चव्हाण (डोंबिवली विधानसभा क्षेत्र) व मा. श्री. विजयजी देवांगण (अखिल भारतीय संघटन मंत्री, सहकार भारती) यांच्या हस्ते करण्यात आले. या शाखेचे वैशिष्ट्य म्हणजे ही पूर्णपणे महिला शाखा आहे.

बँकेने दस्तऐवज मुद्रांक (Franking) सेवा ग्राहकांसाठी गेल्या ५ ते ६ वर्षांपासून सुरु केलेली आहे. यावर्षी आपण एकूण ४४,८९७ दस्तऐवज मुद्रांकित केले असल्याचे सांगितले.

आपण मे. कोटक महिंद्रा ओल्ड म्युच्युअल लाईफ इन्शुरन्स कंपनीबरोबर जीवन विमा व्यवसायाबाबत करार केला आहे. त्याचबरोबर मे. इफ्कोटोकियो जनरल इन्शुरन्स या कंपनीबरोबर सर्व साधारण विमा व्यवसायाबाबत करार

केला आहे. सर्व शाखांच्या माध्यमातून एकूण १३०६ विमा पॉलिसीजची विक्री करुन ग्राहकांना उत्तम पर्याय उपलब्ध करुन दिल्याचे, त्यांनी सांगितले.

बँकिंग व्यवसाय करत असताना सामाजिक ऋणांची अंशतः परतफेड व्हावी या उद्देशाने बँक आपल्या नफ्यातून १% रक्कम धर्मादाय निधीसाठी काढून ठेवत असते. दि. २९.०३.२०१३ रोजी एकूण १२५ सामाजिक, शैक्षणिक व वैद्यकीय संस्थांना ₹ १२ लाख निधीचे वाटप श्री. माधव भंडारी (प्रवक्ता, महाराष्ट्र, भारतीय जनता पार्टी) यांच्या हस्ते करण्यात आले.

तसेच सभासद कल्याण निधी अंतर्गत बँकेच्या सभासदांना वैद्यकिय मदतही देण्यात येते. या आर्थिक वर्षात ₹ ७,१८,५००/- वैद्यकिय सहाय्य सभासदांना करण्यात आले.

त्याचप्रमाणे सभासद कल्याण निधीतून, विद्यार्थी प्राविण्य पुरस्कार देण्यात येतात. तसेच १० वी मध्ये कल्याणात प्रथम येणा-या विद्यार्थ्यास "भारताचार्य वैद्य पुरस्कार" तसेच १२ वी मध्ये प्रथम येणा-या विद्यार्थीनीस भारतातील पहिल्या महिला "डॉक्टर आनंदीबाई जोशी" यांच्या स्मरणार्थ पुरस्कार देण्यात येतो. यावर्षी सदर पुरस्काराचे वितरण कविवर्य प्रा. अशोक बागवे यांच्या शुभहस्ते करण्यात आल्याचे सांगितले.

त्यानंतर त्यांनी पुढील वर्षात राबविण्यात येणा-या योजनांचा थोडक्यात आढावा घेतला. पुढील वर्षी आपण ४ नवीन शाखा सुरु करणार आहोत त्या शाखा पनवेल, पुणे, कोन, टिटवाळा येथे असतील.

तसेच या वर्षी मुख्य कार्यालयाची नवीन वास्तू आधारवाडी येथे तयार होत असून लवकरच त्याचे उद्‌घाटन होईल. त्यानंतर त्यांनी सर्व सभासदांचे आभार मानले व आपले मनोगत संपविले.

ठराव क्र. ३ : सन २०१२-२०१३ सालातील बँकेच्या कामकाजाबाबत संचालक मंडळाच्या वतीने मा. अध्यक्ष **श्री. मोहन श्रीराम आघारकर** यांनी सादर केलेल्या वार्षिक अहवालाची ही सभा नोंद घेत आहे.

सूचक : नाव : श्री. राजेंद्र नारायण तिवारी सभासद क्र. १६४४९
अनुमोदक : नाव : श्री. शरदचंद्र मनोहर सुमंत सभासद क्र. २९३५
ठराव सर्वानुमते मंजूर.

यानंतर पुढील विषय मांडण्यासाठी मा. अध्यक्षांनी मा. संचालक श्री. श्रीनिवास फणसे यांना सांगितले.

मा. संचालक श्री. फणसे यांनी सांगितले की सन २०१२-१३ चा ताळेबंद, नफा-तोटा पत्रक, लेखापरीक्षकांचा अहवाल व त्यासंबंधी इतर कागदपत्रे पाहण्यासाठी काही ठराविक कालावधी ठेवला होता. त्यास अनुसरुन सभासद श्री. एस. जी. पाटील, श्री. विश्वास जोशी व श्री. भास्कर भावसार यांनी पत्रे पाठविली होती. त्यांना प्रत्यक्ष बोलवून त्यांचे शंका निरसन केले आहे. नफा तोटा पत्रक व ताळेबंद आपण सर्वांना उपलब्ध करुन दिले आहे. अंतर्गत व वैधानिक लेखापरीक्षकांच्या अहवालाचा गोषवारा त्यांनी सांगितला.

आपले अंतर्गत लेखापरीक्षक मे. मुकुंद एम. चितळे अँड कं. आहे. यंदा आपले वैधानिक लेखापरीक्षण मे.वैशंपायन ॲण्ड पाध्ये यांनी केले.

ठराव क्र. ४ : संचालक मंडळाने सादर केलेले व वैधानिक लेखापरीक्षक मे. वैशंपायन ॲण्ड पाध्ये यांनी तपासलेले ३१ मार्च २०१३ अखेरचे ताळेबंद, नफातोटा पत्रक मा. संचालक **श्री. श्रीनिवास त्रिंबक फणसे** यांनी वाचून दाखविले व समजावून सांगितले. त्यास ही सभा मंजुरी देत आहे.

सूचक : नाव : श्री. विनायक विष्णू मालसे सभासद क्र. १७८१६
अनुमोदक : नाव : श्री. बबन लक्ष्मण भोईर सभासद क्र. ४७४७३
ठराव सर्वानुमते मंजूर.

यानंतर पुढील विषय मांडण्यासाठी मा. अध्यक्षांनी मा. संचालिका प्रा. सौ. सुषमा फडके यांना सांगितले.

मा. प्रा. सौ. सुषमा फडके यांनी हा अहवाल मांडताना वैधानिक लेखापरीक्षणात बँकेस "अ" वर्ग प्राप्त झाला आहे. तसेच वैधानिक लेखापरीक्षकांनी काही पुढीलप्रमाणे सूचना केल्या आहेत. अंतर्गत / समवर्ती लेखापरीक्षण अहवालाची पूर्तता लवकरात लवकर व्हावी, गृहकर्जाबाबत बँकेने गृहकर्जदारांकडून ताबा पत्र / भोगवटा प्रमाणपत्र दप्तरी घ्यावे, ₹ १०० लाखापेक्षा मोठ्या कर्जदारांचे क्रेडीट रेटींग हे बाह्य क्रेडीट रेटींग संस्थेकडून करुन घ्यावे. लेखापरीक्षकांनी केलेल्या सूचनांची अंमलबजावणी आपण नक्कीच करु असे मा. संचालिका सौ. फडके यांनी सांगितले. त्यानंतर पुढीलप्रमाणे ठराव मांडण्यात आला.

ठराव क्र. ५ : सन २०१२-२०१३ सालच्या वैधानिक लेखापरीक्षकांचा अहवाल मा. संचालिका **प्रा. सौ. सुषमा सुनील फडके** यांनी सभेपुढे मांडला. त्याची ही सभा नोंद घेत आहे.

सूचक : नाव : श्री. देवीदास तोताराम सोनार सभासद क्र. ३०३३३
अनुमोदक : नाव : श्री. सुरेंद्र पंढरीनाथ झूपे सभासद क्र. २२३८८
ठराव सर्वानुमते मंजूर.

मा. अध्यक्षांनी नफावाटणीबाबतचा ठराव मांडण्यासाठी, मा. संचालक प्रा. (डॉ.) वसंत काणे यांना सूचित केले.

मा. प्रा. (डॉ.) वसंत काणे यांनी सांगितले की, बँकेचा नफा हा बँकेच्या प्रगतीचा मापदंड आहे. या वर्षी बँकेचा निव्वळ नफा ₹ १५,०८,१९,१०६.२७ झाला आहे. संचालक मंडळाने यावर्षीही १५% लाभांशाची शिफारस केली आहे. त्यानंतर त्यांनी नफावाटणीचा ठराव मांडला.

ठराव क्र. ६ : सन २०१२-२०१३ या वर्षात निव्वळ नफा ₹ १५,०८,१९,१०६.२७ इतका झाला आहे. संचालक मंडळाने नफा वाटणीस पुढीलप्रमाणे शिफारस केली आहे. ती मा. संचालक **प्रा. (डॉ.) वसंत दत्तात्रय काणे** यांनी सभेसमोर मांडली. सदर नफा वाटणीस ही सभा मंजुरी देत आहे.

| | |
|---|---|
| निव्वळ नफा | १५,०८,१९,१०६.२७ |
| + लाभांश मधील जादा तरतूद | २,८८,८५२.०० |
| मागील शिल्लक | १,५४,९६६.७१ |
| **एकूण** | **१५,१२,६२,९२४.९८** |
| राखीव निधी | ३,८०,००,०००.०० |
| इमारत निधी | १,००,००,०००.०० |
| लाभांश १५% | ६,२०,००,०००.०० |
| सर्वसाधारण मुक्त निधी | १,७५,००,०००.०० |
| गुंतवणूक वध घट निधी | २,००,००,०००.०० |
| धर्मादाय | १५,००,०००.०० |
| वनीकरण (Plantation) | ३,००,०००.०० |
| महोत्सव निधी | ४,००,०००.०० |
| सभासद कल्याण निधी | १५,००,०००.०० |
| पुढील वर्षासाठी शिल्लक | ६२,९२४.९८ |
| **एकूण** | **१५,१२,६२,९२४.९८** |

सूचक : नाव : सौ. सुधा रामचंद्र भिडे सभासद क्र. २४८५
अनुमोदक : नाव : सौ. सुनिता शशिकांत लिमये सभासद क्र. २७६८८
ठराव सर्वानुमते मंजूर.

यानंतर पुढील ठराव मांडण्यासाठी मा. अध्यक्षांनी मा. संचालक श्री हेमल रवाणी यांना सूचविले.

मा. संचालक श्री. हेमल रवाणी यांनी एप्रिल, २०१४ ते मार्च २०१५ या कालावधीसाठी अंतर्गत हिशेब तपासणी, करपरीक्षण, गुंतवणूक लेखापरीक्षण व समवर्ती लेखापरीक्षण करण्याकरिता तपासनीसांची व सन २०१३-१४ साठी वैधानिक लेखापरीक्षक यांची नेमणूक करण्याबाबतचा ठराव मांडला.

**ठराव क्र. ७(अ)**:आर्थिक वर्ष २०१४-१५ साठी अंतर्गत हिशेब तपासणी, गुंतवणूक लेखापरीक्षण, कर परीक्षण व समवर्ती लेखापरीक्षण करणेकरीता तपासनीसांची नेमणूक करण्याबाबतचा ठराव मा. संचालक **श्री. हेमल शांतीलाल रवाणी** यांनी सभेपुढे मांडला.

आर्थिक वर्ष २०१४-१५ साठी अंतर्गत हिशेब तपासणी, कर परीक्षण, गुंतवणूक लेखापरीक्षण, समवर्ती लेखापरीक्षण करणेकरिता तपासनीसांची नेमणूक करण्याचा तसेच त्यांचा मेहेनताना ठरविण्याचा अधिकार ही सर्वसाधारण सभा संचालक मंडळास देत आहे.

सूचक : नाव : श्री. गोविंद गोपाळ पवार सभासद क्र. ३५८७
अनुमोदक : नाव : श्री. सीताराम उत्तम भिंगारदिवे सभासद क्र. १७३२०
ठराव सर्वानुमते मंजूर.

**ठराव क्र. ७(ब)**:सन २०१३-१४ साठी वैधानिक लेखापरीक्षण करणेकरीता तपासनीसांची नेमणूक करण्याबाबतचा ठराव मा. संचालक **श्री. हेमल शांतीलाल रवाणी** यांनी सभेपुढे मांडला.

सन २०१३-१४ साठी वैधानिक लेखापरीक्षण करणेकरीता तपासनीसांची नेमणूक शासनाच्या निर्देशानुसार करण्याचा तसेच त्यांचा मेहेनताना ठरविण्याचा अधिकार ही सर्वसाधारण सभा संचालक मंडळास देत आहे.

सूचक : नाव : श्री. गणेश गंगाधर काळे सभासद क्र. ९२२
अनुमोदक : नाव : श्री. महेश दुगाडे सभासद क्र. १९१२७
ठराव सर्वानुमते मंजूर.

पुढील वर्षाचे अंदाजपत्रक मांडण्यासाठी मा. संचालक श्री. लक्ष्मीकांत उपाध्याय यांना सांगितले.

मा. संचालक श्री. लक्ष्मीकांत उपाध्याय यांनी सन २०१३-१४ चे अंदाजपत्रक मांडले. वार्षिक अहवालात अंदाजपत्रक व त्याचे विवेचनही दिले आहे. पुढील वर्षी ₹ १७.३० कोटी नफा होईल. ठेवींचे उद्दिष्ट ₹ १५३५ कोटी व कर्जाचे उद्दिष्ट ₹ ११०० कोटी ठेवले आहे.

ठराव क्र. ८ : सन २०१३-२०१४ सालचे अंदाजपत्रक मा. संचालक **श्री. लक्ष्मीकांत श्रीधर उपाध्याय** यांनी सभेपुढे मांडले व समाजावून सांगितले. त्याची ही सर्वसाधारण सभा नोंद घेत आहे.

सूचक : नाव : श्री. एस. जे. पाटील सभासद क्र. १८९९८
अनुमोदक : नाव : श्री. बाळकृष्ण रायबा मोरे सभासद क्र. ८९९७
ठराव सर्वानुमते मंजूर.

मा. अध्यक्षांनी निर्लेखनाबाबतचा ठराव मांडण्यास मा. संचालक, ॲड. निशिकांत बुधकर यांना सांगितले.

मा. ॲड बुधकर यांनी सांगितले की संपूर्ण बँकिंग क्षेत्रात यावर्षी अनुत्पादित कर्जामध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झाल्याचे दिसून येत आहे. वाढती महागाई, घटलेले औद्योगिक उत्पादन, नैसर्गिक आपत्ती, आर्थिक मंदी यांचा परिणाम कर्ज वसुलीवर झाला आहे. आपल्या ढोबळ अनुत्पादित कर्जात थोडी वाढ झाली आहे. मार्च २०१२ अखेर एकूण अनुत्पादित कर्जाचे प्रमाण ३.१९% होते. मार्च २०१३ अखेर सदर प्रमाण ३.७४% इतके झाले आहे. तरीदेखील निव्वळ अनुत्पादित कर्जाचे प्रमाण ०% राखले आहे. निर्लेखित केलेल्या कर्जखात्याच्या वसुलीसाठी आपण प्रयत्नशील असतो. अहवाल वर्षात निर्लेखित केलेल्या कर्जखात्यांपोटी ₹ २.६९ लाख वसुली आपण केलेली आहे.

यानंतर पुढीलप्रमाणे ठराव सभापटलावर ठेवण्यात आला.

ठराव क्र. ९ : बँकेच्या वैधानिक लेखापरीक्षकांनी प्रमाणित केलेली ज्या खात्यात वसुलीची शक्यता नाही अशी खाती वसुलीचे सर्व हक्क अबाधित राखून निर्लेखित करणे व नफा - तोटा खाती न घेतलेले व्याज उलटविण्यासंबंधात मा. संचालक **ॲड. निशिकांत पुरुषोत्तम बुधकर** यांनी प्रस्ताव मांडला.

सभेपुढे सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने वैधानिक लेखापरीक्षकांनी प्रमाणित केलेल्या अनुत्पादित कर्जखात्यामधील मुद्दल ₹ ३,२८,३९,६२६.९१ निर्लेखित करण्यास मंजुरी देत आहे व नफातोटा खाती न घेतलेले दि. ३१.०३.२०१३ पर्यंतचे व्याज ₹ ६,०६,२१,७४९.३७ + पुढील व्याज उलटवण्याच्या संचालक मंडळाच्या निर्णयास सदर सभा कायम करित आहे.

| | | |
|---|---|---|
| सूचक : | नाव : श्री. उदय सामंत | सभासद क्र. ४०२४९ |
| अनुमोदक : | नाव : श्री. प्रशांत वसंत मुल्हेरकर | सभासद क्र. ७४७९ |
| | नाव : श्री. दामोदर हरी पाटील | सभासद क्र. ४१९५ |
| | नाव : श्री. सुभाष गोविंद कोलते | सभासद क्र. ४६४५६ |

ठराव सर्वानुमते मंजूर.

यानंतर मा. अध्याक्षांनी कोणाला प्रश्न विचारायचे असतील अथवा शंका असतील तर विचारण्यास सांगितले.

सभासद श्री. रघुनाथ नामदेव डोंगरे यांनी पत्राद्वारे वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना मिळालेली नाही असे सांगितले आणि Statement of Account साठी Charge का आकारले जातात असे विचारले. मा. अध्यक्षांनी त्यांना वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना २०-२५ दिवसांपूर्वी पोस्टामार्फत पाठविण्यात आल्याचे सांगितले. तसेच प्रत्येक शाखेतील Digital Display Board वर सूचना दाखविण्यात आलेली होती. याशिवाय SMS आणि लोकल वर्तमान पत्राद्वारे सुध्दा सभेची सूचना देण्यात आल्याचे सांगितले.

बँक खात्याच्या statement ना charges आकारत नसून जे ग्राहक संपूर्ण वर्षाच्या statements ची मागणी करतात त्यांनाच Nominal charges आकारत असल्याचे सांगितले. शिवाय E-statements वर बँक चार्ज आकारत नसल्याचे अध्यक्षांनी स्पष्ट केले.

सभासद श्री. अरविंद भिडे यांनी विद्यार्थी प्राविण्य पुरस्कार सोहळ्यात बँक डॉ. आनंदी गोपाळ जोशी तसेच श्री. चिंतामणी वैद्य यांच्या नावे पुरस्कार देते परंतु पुरस्कार घेणा-या विद्यार्थ्यांना या दोन्ही मान्यवर व्यक्तींची माहिती देणारी पुस्तिका भेट म्हणून देण्यात यावी असे सुचविले.

यावर मा. अध्यक्षांनी सांगितले की, पुरस्कार सोहळ्यामध्ये मा. संचालिका सौ. सुषमा फडके यांनी डॉ. आनंदी गोपाळ जोशी व भारताचार्य (चिंतामणी) वैद्य यांचेबद्दल विस्तृतपणे माहिती दिलेली होती. परंतु पुस्तिकेबाबत बँक नक्की विचार करेल.

सभासद श्री. रमेश उपाध्याय यांनी सिंडीकेट शाखेचा जिना अतिशय खराब झालेला असून तो सुधारण्यात यावा तसेच खडकपाडा शाखेतील लॉकरकडे जाणा-या पाय-या खराब झाल्याचे सांगितले.

पुढे त्यांनी असेही सुचविले की आपण वैद्यकीय उपचाराबद्दल मदत करतो. तसेच दातांच्या उपचाराबद्दल मदत द्यावी असे सुचविले. शिवाय Recurring Deposit चे पासबुक मुदत संपल्यावर व डिपॉझिट खाते बंद केल्यानंतर ग्राहकांना परत देण्यात यावे असे सांगितले.

यावर अध्यक्षांनी सांगितले की संचालक मंडळ आपल्या सूचनांवर जरुर विचार करेल तसेच दोन्ही शाखांच्या खराब झालेल्या जिन्यांची सुधारणा तातडीने करण्यात येईल.

सभासद श्री. गणेश विष्णू ठोसर यांनी सिंडीकेट शाखेमधील मुदत ठेव विभाग पहिल्या मजल्यावर असल्याने ज्येष्ठ नागरिक / अपंग यांना अडचणीचे ठरत आहे तरी सदर विभाग तळमजल्यावर असावा तसेच शाखेतील ATM कायमस्वरुपी कार्यान्वित असावे अशी सूचना केली.

आपल्या सूचनेचा आम्ही जरुर विचार करु, असे मा. अध्यक्षांनी सांगितले.

सभासद श्री. गोविंद शिवराम वागे यांनी प्रथम संचालक आणि कर्मचा-यांचे अभिनंदन केले. श्री. वागे हे लोकग्राम परिसरात राहतात. सदर भागात अजून एक शाखा / ATM लोकग्राम, लोकधारा या कॉम्प्लेक्सच्या आवारात उघडावी अथवा Railway booking office जवळ ATM उघडावे अशी सूचना केली.

सभासद श्री. अरुण यशवंत चुंबळे यांनी श्री. कॉम्प्लेक्स व गांधारी परिसरात ATM ची सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावी अशी विनंती केली.

यावर अध्यक्षांनी सदर परिसराचा सर्व्हे करुन विचार करण्यत येईल आणि offsite ATM करीता RBI ची परवानगी घ्यावी लागते असे सांगितले.

सभासद श्री. उदय सामंत यांनी कर्ज योजनेत कर्जावरील व्याजदरात "आकर्षक व्याजदर" हा शब्द प्रयोग करु नये अशी सूचना केली.

संचालक मंडळाने याची नोंद घेतली.

सभासद श्री. मोहन वाघमारे यांनी विचारणा केली की त्यांची आपल्या बँकेच्या तीन वेगवेगळ्या शाखांमध्ये खाती असल्याने प्रत्येक खात्याकरीता वेगवेगळे ATM Card द्यावेत.

त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री. खिरवडकर यांनी बँकेला RBI च्या मार्गदर्शक तत्वानुसार असे करता येत नसल्याचे सांगितले. परंतु आपण बँकेच्या कुठल्याही ATM मधून पैसे withdraw करु शकता असे सांगितले.

सभासद श्री. योगेंद्र मंत्री यांनी काळातलाव शाखेतील ATM मध्ये Cheque Depository Machine अथवा Cheque Drop Box असावा, पडघा येथे बँकेची नवीन शाखा उघडावी, मुदत ठेवीवरील व्याजदर वाढवावे आणि मुदत ठेवींची मुदत संपल्याची तारीख ताबडतोब कळवावी, अशा सूचना दिल्या.

यावर मा. अध्यक्षांनी काळातलाव शाखेमध्ये Cheque Depository Machine बसवणार आहेत असे सांगितले आणि इतर बाबींची संचालक मंडळाने नोंद घेतली.

सभासद श्री. वर्मा यांनी ज्येष्ठ नागरिकांकरीता मंगलमूर्ती ठेव योजनेमधील व्याजदर इतर योजनांच्या तुलनेत कमी असल्याचे सांगितले. यावर संचालक मा. श्री. उपाध्याय यांनी बँकेच्या आर्थिक निकषांनुसार व्याजदर निश्चित करीत असल्याचे सांगितले. सभासद श्री. जनार्दन कदम यांनी बँकेने केलेल्या उत्तरोत्तर प्रगतीकरीता तसेच सभासदांना देत असलेल्या आर्थिक सहाय्याबद्दल संचालकांना धन्यवाद दिले.

सभासद श्री. उपेंद्र गंगाधर पाटे (सभासद क्र. ३४१७) मागील Special General Meeting मध्ये सभासदांकरीता Training देण्याबाबत उल्लेख करण्यात आला होता. त्यात ते भाग घेण्यात इच्छूक असल्याचे सांगितले. यावर अध्यक्षांनी सांगितले की Bye Laws सहकार आयुक्तांकडे मंजुरीकरीता पाठविलेले आहे. मंजूर झाल्यावर आपल्या सूचनेचा विचार करु.

सभासद श्री. उपेंद्र पाटे यांनी निर्लेखित केलेल्या कर्जापैकी किती कर्ज रकमेची परतफेड करण्यात आली याबाबत चौकशी केली. त्यावर आतापर्यंत ₹ १.७२कोटी वसुली झाल्याबाबत सांगितले.

सभासद श्री. राजाभाऊ कुलकर्णी (सभासद क्र. २५३०) यांनी आपल्या टिळक चौकातील मुख्य शाखेत ज्येष्ठ नागरिकांना जिने चढण्याचा त्रास होत असल्याचे सांगून ज्येष्ठ नागरिकांना तरी लिफ्टची सुविधा द्यावी अशी सूचना केली.

यावर अध्यक्षांनी संचालक मंडळ आपल्या सूचनेचा जरुर विचार करेल, असे सांगितले.

यानंतर मा. उपाध्यक्ष प्रा. विलास पेणकर यांनी सर्व सभासदांचे आभार मानले. सर्व सभासदांनी अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात सभेचे कामकाज चालवले. काही सभासदांनी उपयुक्त सूचना दिल्या. याबद्दल उपाध्यक्षांनी सर्वांचे आभार मानले व कृतज्ञता व्यक्त केली. त्याच बरोबर सर्व माजी संचालक, अत्रे रंगमंदिर व्यवस्थापन व ध्वनी व्यवस्था, करसल्लागार श्री. केळकर साहेब, बँकेचे उपस्थित कार्यकारी अधिकारी व कर्मचारी वर्ग यांचे देखील ऋणनिर्देश व्यक्त केले.

यानंतर मा. अध्यक्षांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

**मुख्य कार्यकारी अधिकारी** **अध्यक्ष**

D:\TYP2\Board1\AGM\40 AGM MIN Final.docx